Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| Seat No. | |
|---|---|

# [5202]-101

## M.A. (Part I) (First Semester) EXAMINATION, 2017
## MARATHI (मराठी)
### अभ्यासपत्रिका क्रमांक-1
### (व्यावहारिक व उपयोजित मराठी-भाग-I)
### (2008 PATTERN)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.
(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.
(*iii*) **सर्व** उपप्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** शुद्धलेखन म्हणजे काय, ते सांगून शुद्धलेखनाचे महत्त्व स्पष्ट करा.

**किंवा**

खालील उतारा लेखनविषयक नियमांनुसार दुरुस्त करून लिहा :

निबंध हा वाडमयप्रकार इग्रजीतूनच अवर्तीण झाला. मूद्रणकला, दळनवळनाच्या साधनांच्या सुवीधा यामुळे झालेला नियतकालिकांचा उदय निबंधाला जन्म देणारा ठरला. ज्ञाणप्रसार, उद्‌बोधन-प्रबोधन या प्रमुख प्रेरणा नियतकालिकांमागे होत्या. साहजिकच निबधातूनच या प्रेरणांना अनुषंगुनच लेखन केले गेले. आधूनिक वेचारिकतेचा प्रांरभ अशाप्रकारे निबंध वाड्‌मयातून झाला असे म्हटल्यास वावगे ठरू नये. लोकशीक्षणासारी र्निमाण झालेल्या नियतकालिकांनी अनेक विषय आपल्या कवेत घेतले, ते या निबंध वाड्‌मयाद्वारेच.

**2.** मुद्रितशोधन म्हणजे काय हे सांगून मुद्रितशोधनाची आवश्यकता स्पष्ट करा.

**किंवा**

खालील उतारा आपल्या प्रश्नपत्रिकेत जसाच्या तसा लिहून त्याचे खुणांच्या साहाय्याने मुद्रितशोधन करा :

साहीत्यव्यवहाराचे क्षेत्र आता बरच व्यापक झाले आहे. शहरा प्रमाणेच खेडोपाडी झालेल्या शिक्षणप्रसारामुळे आता वाचकवर्ग आहे वाढला; आणी त्याची वाचनाची भुक भागविण्यासाठी वेगवगळ्या प्रकारची ग्रथनिमितीही मोठया प्रमाणावर होऊ लागली आहे. या वर्गातील वाचक सर्वसामान्यांपैकी एक असता. वाचनाचित्याला आवड आणि इच्छा असते पण त्याला विशिट अशी दिशा क्वचीत असते.

**3.** महाराष्ट्रातील विविध साहित्यसंस्थांच्या कार्याचा सविस्तर परिचय करून द्या.

**किंवा**

पुस्तक प्रकाशन प्रक्रियेतील विविध टप्प्यांचा परिचय करून द्या.

**4.** कार्यालयीन व प्रशासनिक पत्रव्यवहाराचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी एका प्रसिद्ध लेखकाची निवड झाली आहे. त्या लेखकाची मुलाखत तयार करा.

**5.** खालीलपैकी **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) अनियतकालिंकाची चळवळ

(ब) स्मरणिका संपादनाचे स्वरूप

(क) प्रशासनिक परिभाषा

(ड) ग्रंथाचा संपादक.

Total No. of Questions—5] [Total No. of Printed Pages—2

| Seat No. | |
|---|---|

# [5202]-102

## M.A. (Part I) (First Semester) EXAMINATION, 2017

## MARATHI (मराठी)

### अभ्यासपत्रिका क्रमांक-2

### अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (1818-1920)

### (2008 PATTERN)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** अव्वल इंग्रजी कालखंडातील सामाजिक व सांस्कृतिक प्रबोधनाचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

1818 ते 1874 या कालखंडातील वाङ्मयनिर्मितीच्या प्रेरणा स्पष्ट करा.

**2.** 'लोकहितवादींच्या शतपत्रा' तील प्रबेधनपर विचारांचा परामर्श घ्या.

**किंवा**

'अव्वल इंग्रजी कालखंडातील नियतकालिके समाजप्रबोधनासाठी निर्माण झाली.' स्पष्ट करा.

**3.** 1850 से 1874 या कालखंडातील सामाजिक, ऐतिहासिक, अद्भुतरम्य कादंबऱ्यांचे स्पष्ट करा.

**किंवा**

1875 ते 1920 या कालखंडातील कथासाहित्याचे मूल्यमापन करा.

**4.** 1875 ते 1920 या कालखंडातील मराठी कवितेची वाटचाल विशद करा.

**किंवा**

1875 ते 1920 या कालखंडातील मराठी नाटकाचे स्वरूप स्पष्ट करा.

P.T.O.

**5.** टीपा लिहा (कोणत्याही **दोन**) :

(1) बाळशास्त्री जांभेकरांचे वृत्तपत्रीय कार्य;

(2) न.चिं केळकर यांचे समीक्षालेखन;

(3) हरिभाऊ आपटे यांच्या सामाजिक कांदबऱ्या

(4) केशवसुतांचे काव्य.

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| Seat No. | |
|---|---|

# [5202]-103

## M.A. (Part-I) (First Semester) EXAMINATION, 2017

## MARATHI (मराठी)

### अभ्यासपत्रिका क्र 3

### (भाषाविज्ञान : वर्णनात्मक)

### (2008 PATTERN)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** भाषा म्हणजे काय ते सांगून उच्चारण आणि लेखन यातील भेद स्पष्ट करा.

**किंवा**

''दळणवळणाचे कार्य भाषेतर माध्यमांनीही करता येते परन्तु मर्यादित प्रमाणात''. या विध ाानाची चर्चा करा.

**2.** भाषाविज्ञानाच्या अभ्यासकक्षा स्पष्ट करून भाषेचा मानसशास्त्राशी असलेला संबंध सांगा.

**किंवा**

भाषाशास्त्र आणि मानववंशशास्त्र यांच्या परस्परसंबंधाची चर्चा करा.

**3.** स्वनिमांचे प्रकार सांगून मराठीची स्वनिमव्यवस्था स्पष्ट करा.

**किंवा**

रूपिका-रूपिम-रूपिकांतर या संकल्पना सोदाहरण स्पष्ट करा.

P.T.O.

**4.** वाक्य म्हणजे काय ? ते सांगून वाक्याचे प्रथमोपस्थित संघटक पद्धतीचे विश्लेषण कसे केले जाते ? सोदाहरण लिहा.

**किंवा**

'अर्थविन्यास' ही संकल्पना स्पष्ट करून अर्थाचे प्रकार सोदाहरण लिहा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) व्यवहाराची भाषा आणि साहित्याची भाषा

(2) भाषाविज्ञान आणि बोलीभूगोल

(3) खंडाधिष्ठित स्वनिम

(4) रूपांची घटना.

Total No. of Questions—**5+5+5+5+5**] [Total No. of Printed Pages—**8**

| **Seat No.** | |
|---|---|

# [5202]-104

## M.A. (Part I) (First Semester) EXAMINATION, 2017
## MARATHI (मराठी)
## अभ्यासपत्रिका क्र.4 (ऐच्छिक)
## (2008 PATTERN)

खालील **पाच** अभ्यासपत्रिकांपैकी कोणतीही एक प्रश्नपत्रिका सोडवावी :

(1) ग्रामीण साहित्य

**किंवा**

(2) मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (प्रारंभ ते 1818)

**किंवा**

(3) तौलनिक साहित्याभ्यास

**किंवा**

(4) वाङ्मयेतिहास लेखनविद्या

**किंवा**

(5) अलंकार व छंद

### (1) ग्रामीण साहित्य

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा व प्रवृत्ती स्पष्ट करा.

**किंवा**

'शैक्षणिक विकास व जाणीव जागृती यातून ग्रामीण साहित्याची निर्मिती झाली आहे. चर्चा करा.

**2.** 'ग्रामीण साहित्यात समाजाचे व संस्कृतीचे दर्शन घडते.' चर्चा करा.

**किंवा**

गावगाड्याची जडणघडण आणि ग्रामीण साहित्य यांच्यातील परस्परसंबंध स्पष्ट करा.

**3.** ‘ग्रामीण साहित्य हे सामाजिक बांधिलकी जोपासणारे साहित्य आहे’. सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

‘नव्या अभिरूचीची जडणघडण ग्रामीण साहित्यातून प्रकट झाली आहे. स्पष्ट करा.

**4.** स्वातंत्र्यपूर्ण काळातील ग्रामीण साहित्याचा परामर्श घ्या.

**किंवा**

स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण कथेच्या विकासाची स्थितीगती स्पष्ट करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) ग्रामीण साहित्याची मर्यादा.

(2) स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण कवितेची वैशिष्ट्ये.

(3) डॉ. आनंद यादव यांचे वाङ्मयीन कार्य.

(4) ‘ग्रामीण’ ही संकल्पना.

**(2) मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (प्रारंभ ते 1818)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.
(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** 'साहित्यातून संस्कृती आकाराला येते की संस्कृतीतून साहित्याची जडणघडण होते ? विवेचन करा.

**किंवा**

महाराष्ट्र संस्कृतीच्या विकासातील मराठी साहित्याचे योगदान स्पष्ट करा.

**2.** महराष्ट्रातील धर्मपंथ आणि मराठी साहित्य यांच्यातील अनुबंध स्पष्ट करा.

**किंवा**

एखादा संप्रदाय समकालीन साहित्याला कसा प्रभावित करतो ते सविस्तर सांगा.

**3.** महानुभाव पंथाने मराठी वाङ्मयाला कोणती देणगी दिली आहे. सविस्तर सांगा.

**किंवा**

यादवकालीन मराठी साहित्याचा परामर्श घ्या.

**4.** " 'लावणी व पोवाडा' हे वाङ्मयप्रकार पेशवेकालीन महाराष्ट्र संस्कृतीचे निदर्शक होत." चर्चा करा.

**किंवा**

साहित्य प्रसाराच्या मध्ययुगीन माध्यमांचा परिचय करून द्या.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) बहामणीकालीन साहित्यातील परभाषेचा प्रभाव

(2) तुकारामांचे अभंग

(3) मनाचे श्लोक

(4) पंडिती वाङ्मय.

**(*iii*) तौलनिक साहित्याभ्यास**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** तौलनिक साहित्याभ्यासाचे स्वरूप व महत्व स्पष्ट करा.

**किंवा**

'तौलनिक साहित्याभ्यासातून वाङ्मय व संस्कृतीविषयक जाणिवा प्रगल्भ होतात.' चर्चा करा.

**2.** विविध वाङ्मय प्रवाहांची थोडक्यात माहिती सांगून 'प्रभाव' व 'प्रभव' यामधील वेगळेपण सिद्ध करा.

**किंवा**

राष्ट्रीय साहित्याची संकल्पना सोदाहरण विशद करा.

**3.** विश्वसाहित्य म्हणजे काय ? हे सांगून तौलनिक साहित्याभ्यासासाठी त्याची उपयुक्तता स्पष्ट करा.

**किंवा**

विश्वसाहित्याची संकल्पना स्पष्ट करून त्याची व्याप्ती व महत्व विशद करा.

**4.** बा.सी. मर्ढेकर व काझी सलीम यांच्या कवितेत सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंब कशा प्रकारे उमटले आहे ते. स्पष्ट करा.

**किंवा**

बा.सी. मर्ढेकर व काझी सलीम यांच्या कवितांच्या वाङ्मयीन विशेषांचे मूल्यमापन करा.

**5.** टीपा लिहा (कोणत्याही **दोन**) :

(1) तौलनिक साहित्याभ्यासाच्या मर्यादा;

(2) सहजसाधर्म्य

(3) मर्ढेकर व काझी सलीम यांच्या कवितेतील साम्य

(4) मर्ढेकर व काझी सलीम यांचा जीवनविषयक दृष्टिकोन.

# [5202]-104

## (4) वाङ्मयेतिहास लेखनविद्या

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** 'इतिहास' ही संकल्पना स्पष्ट करून इतिहासलेखनासंबंधीच्या विविध उपपत्तींचा परामर्श घ्या.

**किंवा**

वाङ्मयेतिहासलेखन व अन्य प्रकारचे इतिहासलेखन यातील साम्यभेद सोदाहरण स्पष्ट करा.

**2.** वाङ्मयेतिहास म्हणजे काय ते सांगून वाङ्मयेतिहासाचा संशोधन आणि टीकाशास्त्र यांच्याशी असलेला अनुबंध स्पष्ट करा.

**किंवा**

'वाङ्मयेतिहास' हे वाङ्मयाच्या अभ्यासाचे व संशोधनाचे स्वतंत्र क्षेत्र आहे' या विधानाची चर्चा करा.

**3.** 'वाङ्मयेतिहास' संकल्पनेच्या संदर्भात पाश्चात्य अभ्यासकांच्या विचारांची मीमांसा करा.

**किंवा**

वाङ्मयेतिहास संकल्पनेविषयी भारतीय अभ्यासकांच्या विचारांचा परामर्श घ्या.

**4.** वाङ्मयेतिहासकारांच्या उद्दिष्टांनुसार वाङ्मयेतिहास लेखनाचे कोणते प्रकार पडतात, ते सविस्तर लिहा.

**किंवा**

वाङ्मयेतिहास लेखनाचा स्वरूपावरून पडणाऱ्या प्रकारांचे सोदाहरण विवेचन करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी.

(2) वाङ्मयेतिहासाची सामग्री

(3) वाङ्मयीन परंपरा व वाङ्मयीन घटना

(4) वाङ्मयेतिहासलेखनाची ध्येये व उद्दिष्टे.

# [5202]-104

## (5) अलंकार व छंद

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—**(1) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(2) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** अलंकार या संज्ञेचे स्वरूप सांगून अलंकाराच्या मुळाशी कोणकोणती तत्त्वे सांगितली जातात ते लिहा.

**किंवा**

''अलंकार ही काव्याची भूषणे आहेत.'' या विधानाची चर्चा करा.

**2.** छंद आणि वृत्त यांचे कवितेतील योगदान स्पष्ट करा.

**किंवा**

प्रमुख छंदप्रकार कोणते ते सांगून, ओवी आणि अभंग यांचा सोदाहरण परिचय करून द्या.

**3.** काव्यगुण ही संकल्पना स्पष्ट करून गुण आणि अलंकार यांच्यातील परस्परसंबंधाची सोदाहरण चर्चा करा.

**किंवा**

वामन आणि कुंतक यांनी सांगितलेल्या काव्यगुणांचा सोदाहरण परिचय करून द्या.

**4.** उपमा, रूपक व वक्रोक्ती या अलंकारांची उदाहरणासह माहिती लिहा.

**किंवा**

मुक्तछंदाचे स्वरूप सांगून त्याचे काव्यातील महत्व उदाहरणासह स्पष्ट करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) काव्यविभ्रम

(2) दण्डीची अलंकारमीमांसा

(3) वि.का. राजवाडे यांचे छंदविषयक विचार

(4) काव्यातील प्रतिमांचे स्थान

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| Seat No. | |
|---|---|

# [5202]-201

## M.A. (Part I) (Sem. II) EXAMINATION, 2017

## MARATHI (मराठी)

## अभ्यासपत्रिका क्र. 1

## (व्यावहारिक व उपयोजित मराठी, भाग-2)

## (2008 PATTERN)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** भाषांतर, अनुवाद, भावानुवाद या संकल्पना स्पष्ट करा.

**किंवा**

खाली दिलेल्या इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा :

TV has become a popular, useful and very powerful means of spreading education. We can sit at home at ease, switch on the TV set and watch a wide variety of interesting programmes. TV brings us the news of events taking place in far-off places. We get instant news happenings from all corners of the world. TV is entertaining as well as educative.

We can watch on TV programmes like serials, movies, concerts, dances and sports. The competitions on TV help students to be a part of different cultural and educational activities.

**2.** निवेदनाची तंत्रे सांगून प्रभावी निवेदनाची गुण वैशिष्ट्ये सांगा.

**किंवा**

जनसंपर्क कौशल्यांच्या साधनांचे स्वरूप स्पष्ट करा.

**3.** विविध प्रसार माध्यमांचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

सांस्कृतिक महोत्सवाच्या कार्यक्रमाच्या नियोजनाची संहिता तयार करा.

**4.** शासकीय क्षेत्रातील जनसंपर्क अधिकाऱ्याची भूमिका, जबाबदारी व भाषाकौशल्य यांचे विवेचन करा.

**किंवा**

आकाशवाणीवरील निवेदनाचे स्वरूप सोदाहरण स्पष्ट करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) जनसंपर्क कौशल्याची तंत्रे

(2) महाविद्यालयातील जनसंपर्क अधिकारी

(3) सूत्रसंचालकाची वैशिष्ट्ये

(4) भाषणकौशल्य

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| Seat No. | |
|---|---|

# [5202]-202

## M.A. (Part I) (Second Semester) EXAMINATION, 2017

## MARATHI (मराठी)

## अभ्यासपत्रिका क्र. 2

## अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (1920 ते 1960)

## (2008 PATTERN)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** 1920 ते 1960 या कालखंडातील निवडक कवींच्या कार्याचा आढावा घ्या.

**किंवा**

रविकिरणमंडळाचे मराठी साहित्यातील योगदान स्पष्ट करा.

**2.** 1920 ते 1939 या कालखंडातील प्रमुख कादंबरीकराचा परिचय करून द्या.

**किंवा**

नवकथा म्हणजे काय ? हे सांगून मराठीतील प्रमुख नवकथाकारांचा परिचय करून द्या.

**3.** 1920 ते 1945 या कालखंडातील नाटककारांचा परिचय करून द्या.

**किंवा**

1920 ते 1960 या कालखंडातील साहित्य विचाराचे स्वरूप स्पष्ट करा.

**4.** 1920 ते 1945 या कालखंडातील नाटयवाङ्मयाचा परिचय करून द्या.

**किंवा**

1920 नंतरच्या निबंधवाङ्मयात झालेल्या परिवर्तनाचा आढावा घ्या.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) विनोदी कथालेखन

(2) दलित नियतकालिके

(3) 1920 ते 1960 या कालखंडातील चरित्र-आत्मचरित्र लेखनाची वैशिष्ट्ये

(4) दिवाकरांच्या नाट्यछटा.

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| Seat No. | |
|---|---|

**[5202]-203**

**M.A. (Part I) (Second Semester) EXAMINATION, 2017**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्रमांक-3**

**भाषाविज्ञान : सामाजिक**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** 'सामाजिक भाषाविज्ञान' ही संकल्पना स्पष्ट करून तिची व्याप्ती लिहा.

**किंवा**

समाजभाषाविज्ञानाच्या संदर्भात विविध भाषावैज्ञानिकांच्या मतांचा परिचय करून द्या.

**2.** भाषा, बोली आणि समाज यांचा परस्परसंबंध स्पष्ट करा.

**किंवा**

भाषा, तिची आर्थिक वर्गव्यवस्था आणि जातिवर्गव्यवस्था या घटकांचा सामाजिक भाषाविज्ञानाच्या दृष्टीने विचार करा.

**3.** 'विविध व्यवसायक्षेत्रानुसार भाषेच्या स्वरूपात बदल होतो.'' स्पष्ट करा.

**किंवा**

भाषा, सामाजिक परंपरा व विविध सामाजिक संस्था यांचा परस्परसंबंध विशद करा.

P.T.O.

**4.** परभाषेच्या संपर्कामुळे पिजिन व क्रिऑल भाषांची निर्मिती कशी होते, ते स्पष्ट करा.

**किंवा**

समाजांतर्गत उदयाला आलेल्या नव्या व्यवस्थेनुसार मराठी भाषेच्या आविष्कार पद्धतीत झालेले बदल स्पष्ट करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) भाषेचा लिंगभेदानुसारी वापर

(2) प्रमाणभाषा आणि परभाषा संपर्क

(3) भाषा आणि सांस्कृतिक व्यवस्था

(4) भाषा आणि जातिव्यवस्था.

Total No. of Questions—**5+5+5+5+5**] [Total No. of Printed Pages—**7**

| Seat No. | |
|---|---|

**[5202]-204**

**M.A. (Part I) (Sem. II) EXAMINATION, 2017**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्रमांक 4**

**(ऐच्छिक)**

**(2008 PATTERN)**

**विशेष सूचना :—** खालील पाच अभ्यासपत्रिकांपैकी कोणतीही **एक** प्रश्नपत्रिका सोडवावी.

(1) दलित साहित्य

**किंवा**

(2) मराठी वाङ्‌मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (1818 ते 1960)

**किंवा**

(3) तौलनिक साहित्याभ्यास व भाषांतरमीमांसा

**किंवा**

(4) वाङ्‌मयेतिहास लेखनविद्या (भाग 2)

**किंवा**

(5) व्याकरण

**(1) दलित साहित्य**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** दलित साहित्यातून व्यक्त होणाऱ्या वेदना व विद्रोहाचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

दलित साहित्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करून दलित साहित्यावरील आक्षेपांचा परामर्श घ्या.

P.T.O.

**2.** डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कार्ल मार्क्स यांच्या विचारातील साम्यभेद सांगून दलित साहित्यावरील त्यांचा प्रभाव स्पष्ट करा.

**किंवा**

मराठी साहित्यातील प्रमुख दलित कवींचे योगदान स्पष्ट करा.

**3.** दलित साहित्याचे वेगळेपण सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

दलित चळवळीने दलित साहित्यास दिलेले योगदान स्पष्ट करा.

**4.** दलित साहित्यातील स्त्रियांच्या आत्मकथनांचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

दलित कथेतून सामाजिक वास्तवाचे दर्शन कसे घडते ते साधार लिहा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) आंबेडकरी जलसे व लोकनाट्य

(2) दलित साहित्य आणि सामाजिक बांधिलकी

(3) दलित कादंबरी

(4) दलित साहित्य आस्वाद व आकलन

(2) मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (1818 ते 1960)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** अव्वल इंग्रजी कालखंडात झालेल्या भौतिक सुधारणेचा मराठी साहित्यनिर्मितीशी असलेला संबंध स्पष्ट करा.

**किंवा**

मराठी साहित्य प्रचाराच्या अर्वाचीन माध्यमांचे स्वरूप स्पष्ट करा.

**2.** एकोणिसाव्या शतकातील धार्मिक चळवळीच्या कार्याचे महत्व सांगून या चळवळीचे प्रतिबिंब तत्कालीन मराठी साहित्यात कसे दिसते ते सांगा.

**किंवा**

''इ.स. 1843 मध्ये झालेली मराठी रंगभूमीची निर्मिती ही अर्वाचीन महाराष्ट्रातील महत्वाची सांस्कृतिक व वाङ्मयीन घटना होय.'' चर्चा करा.

**3.** गांधीवाद व मार्क्सवाद यांचा प्रभाव मराठी साहित्यावर कशाप्रकारे पडला आहे ? ते सप्रमाण सांगा.

**किंवा**

''म. फुले यांनी केलेल्या सामाजिक-सांस्कृतिक क्रांतीचे दर्शन त्यांच्या वाङ्मयातून घडते.'' कसे ते स्पष्ट करा.

**4.** मराठी साहित्य प्रचाराच्या अर्वाचीन माध्यमांचे स्वरूप विशद करा.

**किंवा**

''नवकथेतून बदलत्या समाज-संस्कृतीचे दर्शन घडते.'' कसे ते साधार सांगा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) अमेरिकन मिशनची स्थापना आणि मराठी साहित्य

(2) दोन महायुद्धे आणि मराठी साहित्य

(3) केशवसुतांची कविता

(4) चिपळूणकरांची निबंधमाला.

# [5202]-204

## (3) तौलनिक साहित्याभ्यास व भाषांतरमीमांसा

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** 'भाषांतर म्हणजे काय' ते सांगून भाषांतराच्या प्रकारांचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

भाषांतरविषयक सिद्धांताचा परिचय करून देऊन भाषांतर व अनुवाद यातील संबंध स्पष्ट करा.

**2.** भाषांतराचे कार्य कोणते ते सांगून कवितेचे भाषांतर कसे केले जाते ते सांगा.

**किंवा**

'मराठी साहित्याच्या विकासास अनुवादाने सहाय्य केले आहे' कसे ते सोदाहरण सांगा.

**3.** 'हवेली वेव्हरलेंची' व 'तुंबाडचे खोत' या कांदबऱ्यांचे वाङ्मयीन मूल्यमापन करा.

**किंवा**

'हवेली वेव्हरलेंची' व 'तुंबाडचे खोत' या कांदबऱ्यातील पात्रचित्रणाच्या वैशिष्ट्यांची तुलना करा.

**4.** 'हवेली वेव्हरलेंची' या कादंबरीत अद्‌भूतरम्य वातावरणाचे दर्शन घडते' कसे ते स्पष्ट करा.

**किंवा**

'तुंबाडचे खोत' या कादंबरीतील स्त्रीपात्रांचा परिचय करून द्या.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) अनुवादातील अडचणी

(2) नाटकाच्या भाषांतरातील अडचणी

(3) 'तुंबाडचे खोत' मधील प्रादेशिकता

(4) 'हवेली वेव्हरलेंची' मधील अनुभवविश्व.

(4) वाङ्‌मयेतिहास लेखनविद्या (भाग 2)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** भारतीय वाङ्‌मयेतिहासाची संकल्पना स्पष्ट करा.

**किंवा**

मराठी वाङ्‌मयाच्या भारतक्षेत्रीय अभ्यासाचे स्वरूप विशद करा.

**2.** मध्ययुगीन मराठी वाङ्‌मयेतिहासाचे लेखन करताना येणाऱ्या समस्या न अडचणी यांचा परमार्श घ्या.

**किंवा**

आधुनिक मराठी वाङ्‌मयेतिहासाचे लेखन करताना येणाऱ्या समस्या व अडचणी यांचा परामर्श घ्या.

**3.** गो. म. कुलकर्णी, व. दि. कुलकर्णी आणि म. ना. अदवंत यांनी केलेल्या वाङ्‌मयेतिहास लेखनकार्याची माहिती लिहा.

**किंवा**

मराठी वाङ्‌मयेतिहास लेखनाचा वि. ल. भावे ते महाराष्ट्र साहित्य परिषद प्रकल्पापर्यंतचा आढावा घ्या.

**4.** 1847 पर्यंत झालेल्या मराठी वाङ्‌मयेतिहास विचाराचा परामर्श घ्या.

**किंवा**

मराठीतील वाङ्‌मयेतिहास विचारांची वाटचाल सविस्तर स्पष्ट करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) मराठी वाङ्‌मयाचे हिंदी भाषेतील वाङ्‌मयेतिहास लेखन

(2) वाङ्‌मयेतिहास लेखनातील तात्विक व तांत्रिक अडचणी

(3) स. गं मालशे यांचे वाङ्‌मयेतिहासविषयक लेखनकार्य

(4) माटे-बेडेकर वाद

# [5202]-204

## (5) व्याकरण

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** व्याकरण म्हणजे काय ते सांगून त्याची व्याप्ती व मर्यादा स्पष्ट करा.

**किंवा**

'भाषेच्या विकासात व्याकरणाचे महत्वाचे योगदान असते' हे विधान स्पष्ट करा.

**2.** व्याकरणाचे विविध प्रकार कोणते ते सांगून कोणत्याही **एका** प्रकाराची सविस्तर माहिती लिहा.

**किंवा**

व्याकरणाचे विविध प्रकार सांगून त्यांचा परस्परांशी कसा संबंध असतो ते स्पष्ट करा.

**3.** वर्ण, शब्द व वाक्य यांच्यातील अनुबंध स्पष्ट करा.

**किंवा**

मराठी व्याकरणातील शब्द व वर्ण विचारांचा सविस्तर परिचय करून द्या.

**4.** मराठी व्याकरणाविषयी कोणते वादविवाद आहेत ते लिहा.

**किंवा**

मराठीतील व्याकरणविषयक विचारांचा सविस्तर आढावा घ्या.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) मराठी व्याकरणातील समस्या

(2) व्याकरणकार मोरो केशव दामले

(3) मराठीतील प्रयोगविचार

(4) वाक्यविचार

Total No. of Questions—**5**]

[Total No. of Printed Pages—**2**

| Seat No. | |
|---|---|

# [5202]-301

**M.A. (Part-II) (Third Semester) EXAMINATION, 2017**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 5**

**(प्रसारमाध्यमे आणि साहित्यव्यवहार)**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** वृत्तसंस्कृतीचे स्वरूप व घटक यांची साधार चर्चा करा.

**किंवा**

मुद्रित माध्यमातील भाषेच्या वैशिष्ट्यांची साधार चर्चा करा.

**2.** कलानिहाय सृजनात्मक आस्वादाचे स्वरूप साधार स्पष्ट करा.

**किंवा**

'चित्रांचे प्रदर्शन' या विषयावर दैनिकासाठी आस्वाद लेखन करा.

**3.** अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांचा परिचय दैनिकासाठी लिहा.

**किंवा**

एका पुरोगामी विचारवंताचा व्यक्तिवेध घेणारा वृत्तलेख तयार करा.

**4.** दृक्-श्राव्य माध्यमातील लेखनाची वैशिष्ट्ये सोदाहरण विशद करा.

**किंवा**

'संगीत मैफिलीं'चा वृत्तलेख आकाशवाणीवरून प्रसारीत करण्यासाठी तयार करा.

**5.** कोणत्याही **दोन**वर टीपा लिहा :

(अ) पटकथेची वैशिष्ट्ये

(ब) प्रवासवर्णन लेखनाचे घटक

(क) संवाद लेखन कौशल्य

(ड) पर्यावरण जागृतीवर रिपोर्ताज लेखन.

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| Seat No. | |
|---|---|

# [5202]-302

## M.A. (Part II) (Third Semester) EXAMINATION, 2017

## MARATHI (मराठी)

### अभ्यासपत्रिका क्रमांक-06

### (साहित्य समीक्षा आणि संशोधन)

### (2008 PATTERN)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** समीक्षा म्हणजे काय ? समीक्षेची संकल्पना स्पष्ट करा.

**किंवा**

''साहित्यसमीक्षक हा लेखक व वाचक यामधील एक महत्वाचा दुवा आहे.'' परामर्श घ्या.

**2.** आदर्श समीक्षकाला चिकित्सकता आणि मूल्यविवेक याचे भान कसे राखावे लागते ? हे सोदाहरण विशद करा.

**किंवा**

वाङ्मयीन समीक्षेत कोणती पथ्ये पाळावी लागतात, ते सांगा.

**3.** कलाकृतींमधील सौंदर्यानंद उलगडून दाखविण्यातील आस्वादक समीक्षेची भूमिका सोदाहरण विशद करा.

**किंवा**

समाजशास्त्रीय समीक्षेची व्यापक संकल्पना स्पष्ट करा.

**4.** स्वातंत्र्यपूर्व काळातील समीक्षेचा परिचय करून द्या.

**किंवा**

1945 से 1975 या कालखंडातील जीवनवादाचे स्वरूप स्पष्ट करा.

**5.** टिपा लिहा (फक्त **दोन**) :

(1) स्त्रीवादी समीक्षा

(2) समीक्षकाची तुलनाक्षमता

(3) समीक्षेतील व्यक्तिनिष्ठता व वस्तुनिष्ठता यांचे तारतम्य

(4) मूल्यमापन : समीक्षेचे प्रयोजन.

Total No. of Questions—**5+5**] [Total No. of Printed Pages—**4**

| Seat No. | |
|---|---|

# [5202]-303

**M.A. (Part II) (Third Semester) EXAMINATION, 2017**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्रमांक-07**

**(विशेष लेखकाचा अभ्यास) (प्राचीन/अर्वाचीन)**

**प्राचीन : संत तुकाराम**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.
(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** संत तुकारामाच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण त्यांच्या अभंगाच्या आधारे स्पष्ट करा.

**किंवा**

संत तुकारामांच्या चरित्रात्मक अभंगाचा आढावा घ्या.

**2.** 'बरे झाले देवा निघाले दिवाळे ।' या अभंगाच्या आधारे संत तुकारामांच्या मानसिक संघर्षाचा परिचय करून द्या.

**किंवा**

संत तुकारामांच्या साधकावस्थेत विठ्ठलभक्ती आणि पंढरीमहात्म्य कसे व्यक्त झाले ते सांगा.

**3.** ''संत तुकाराम हे 'मानवधर्माचे प्रवर्तक' म्हणून मान्यता पावलेले संत आहेत.'' साधार लिहा.

**किंवा**

संत तुकारामांच्या उपदेशपर अभंगातून कोणते तत्त्वज्ञान स्पष्ट झाले आहे ? विशद करा.

4. एक लोकशिक्षक म्हणून संत तुकारामांच्या अभंगाचा आढावा घ्या.

**किंवा**

'धर्म व समाज' या संदर्भात तुकारामांच्या विचारांचे वेगळेपण साधार लिहा.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) संत तुकारामांचे बाळक्रीडेचे अभंग

(ब) तुकारामांच्या भक्तीतील उत्कटता

(क) तुकारामांनी सांगितलेला संतसंगतीची महिमा

(ड) 'तुका झालासे कळस'चे जीवनसूत्र.

# [5202]-303

**(अर्वाचीन द.ता. भोसले)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** द.ता. भोसले यांच्या कादंबऱ्यातून मानवी जीवनाचे रंग-भावतरंग उलगडून दाखवा.

**किंवा**

'पार आणि शिवार' या ललित गद्य लेखनातील व्यक्तिचित्रणाचे स्वरूप उलगडून दाखवा.

**2.** द.ता. भोसले यांच्या कथा लेखनाची वाङ्मयीन गुणवत्ता विशद करा.

**किंवा**

'परिघावरची माणसं' आणि 'आठवणीतला दिवस' या ललित गद्य लेखनाचे अंतरंग विशद करा.

**3.** द.ता. भोसले यांच्या ललित लेखनाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**किंवा**

'इथे फुलांना मरण जन्मता' या कादंबरीची आशय, विषय आणि अभिव्यक्ती या दृष्टीने चर्चा करा.

**4.** एक समर्थ ग्रामीण लेखक म्हणून द.ता. भोसले यांच्या साहित्याचा परिचय करून द्या.

**किंवा**

मी आणि माझा बाप' या कादंबरीचे मूल्यमापन करा.

5. टीपा लिहा (फक्त **दोन**) :

(अ) 'बाळमुठीतील दिवस' शीर्षकाची समर्पकता

(ब) 'मनस्विनी' या कथासंग्रहातील विशेष

(क) 'पाळत' या कथासंग्रहातील काव्यमयता

(ड) 'पाऊस या कथासंग्रहातील प्रतिमा आणि प्रतिके.

Total No. of Questions—**5+5+5+5+5**] [Total No. of Printed Pages—**6**

| Seat No. | |
|---|---|

**[5202]-304**

**M.A. (Part II) (Third Semester) EXAMINATION, 2017**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यापत्रिका क्र. 8 (ऐच्छिक)**

**(2008 PATTERN)**

**विशेष सूचना :** खालील **पाच** अभ्यासपत्रिकांपैकी कोणतीही **एक** प्रश्नपत्रिका सोडवावी:

(*i*) लोकसाहित्याची मूलतत्त्वे आणि मराठी लोकसाहित्य.

**किंवा**

(*ii*) सौंदर्यशास्त्र

**किंवा**

(*iii*) लेखनविद्या व निबंधलेखन.

**किंवा**

(*iv*) मराठीतील वैचारिक साहित्य आणि साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास

**किंवा**

(*v*) साहित्य : सर्जन व उपयोजन.

**(*i*) लोकसाहित्याची मूलतत्वे आणि मराठी लोकसाहित्य**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** 'लोक' व 'साहित्य' या पदांचे लोकसाहित्याचा संदर्भात स्पष्टीकरण करा.

**किंवा**

लोकसाहित्याच्या सामाजिक व राष्ट्रीय जीवनाशी असलेला अनुबंध उलगडून दाखवा.

**2.** लोकसाहित्याच्या अध्ययनाची आवश्यकता साहित्य, शास्त्र यांच्या अनुषंगाने कशी आहे ? चर्चा करा.

**किंवा**

लोकसाहित्यातील विविध संप्रदायांचा आढावा घ्या.

**3.** लोकसाहित्य आणि ग्रांथिक साहित्य यातील परस्परसंबंध विशद करा.

**किंवा**

लोकसाहित्याचा सादरीकरणातून व्यक्त होणाऱ्या लोकतत्त्वाची वैशिष्ट्ये सांगा.

**4.** लोकसाहित्याच्या संकलनाच्या विविध पद्धतींचा परिचय करून द्या.

**किंवा**

संतसाहित्यातून लोकसाहित्याचे दर्शन कसे घडते ते साधार लिहा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) लोकसाहित्याची आस्वादकता

(आ) लोकसाहित्याचे राष्ट्रीय जीवनाशी असलेले अनुबंध

(इ) लोकसमजुती

(ई) लोकसाहित्याच्या अभ्यासकाने पाळावयाची पथ्ये.

# [5202]-304

**(*ii*) सौंदर्यशास्त्र**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** सौंदर्यानुभवातील विविध घटकांचा थोडक्यात परिचय करून द्या.

**किंवा**

सौंदर्यशास्त्र आणि समीक्षा यातील सहसंबंध स्पष्ट करा.

**2.** द्विधृवात्मकतेच्या संदर्भात सौंदर्यवाचक विधानाचे स्वरूप लिहा.

**किंवा**

सौंदर्याविधान आणि तार्किकता यातील साम्यभेद विशद करा.

**3.** क्रोचेच्या आविष्कारवादी सिद्धान्ताची चर्चा करा.

**किंवा**

सौंदर्यशास्त्रातील क्रिडासिद्धान्ताचे साधार विश्लेषण करा.

**4.** 'सौंदर्यानुभवातील वैश्विकता' ही संकल्पना उलगडून दाखवा.

**किंवा**

सौंदर्यानुभवातील स्वायत्तता आणि विविधता स्पष्ट करा.

**5.** कोणत्याही **दोहोंवर** टीपा लिहा :

(अ) समीक्षेतील प्रमाणबद्धता आणि सौंदर्यशास्त्र.

(ब) सहअनुभूतीचा सिद्धान्त.

(क) बा.सी. मर्ढेकर यांचा लयसिद्धान्त.

(ड) सौंदर्यानुभव आणि व्यावहारिक अनुभव.

# [5202]-304

## (*iii*) लेखनविद्या व निबंधलेखन

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** जीवनव्यवहारातील संवाद ही संकल्पना प्रकारांसह विशद करा.

**किंवा**

संवाद प्रक्रिया विविध माध्यमांसह बदलते. साधार लिहा.

**2.** संवादविषयक सिद्धान्तांचा सोदाहरण परामर्श घ्या.

**किंवा**

विविध संवाद माध्यमांची थोडक्यात ओळख कथन द्या.

**3.** अर्थनिश्चिती मागील निकषांचे सोदाहरण विवेचन करा.

**किंवा**

अर्थ म्हणजे काय ? अर्थाचे प्रकार लिहा.

**4.** सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील संवाद व्यवहाराचे स्थान व महत्व स्पष्ट करा.

**किंवा**

व्यक्तिगत आणि सामाजिक स्तरावरील संवाद प्रक्रियेचे वेगळेपण विशद करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) संवादातील अडथळे.

(ब) साहित्यातील संवाद.

(क) आर्थिक क्षेत्रातील मराठी भाषेचे स्वरूप.

(ड) भाषेतील प्रगत संवाद तंत्र साधने.

**(*iv*) मराठीतील वैचारिक साहित्य आणि साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास.**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** प्रखर बुद्धिनिष्ठा आणि वैचारिकता हे मराठीतील वैचारिक साहित्याचे प्रधान लक्षण आहे. साधार लिहा.

**किंवा**

ललित साहित्यापेक्षा वैचारिक साहित्याच्या वेगळेपणाची मराठीच्या संदर्भात साधकबाधक चर्चा करा.

**2.** मराठीतील वैचारिक साहित्याच्या जडणघडणीत वृत्तपत्रांनी मोठाच हातभार लावला. सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

महात्मा ज्योतिबा फुले लोकहितवादी आणि विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या वैचारिक साहित्याची वैशिष्ट्ये लिहा.

**3.** मराठी निबंध वाङ्मयातील गांधीवादाच्या प्रभावाचे विश्लेषण करा.

**किंवा**

मराठी निबंध वाङ्मयातील राष्ट्रवादी विचारांची चर्चा करा.

**4.** विठ्ठल रामजी शिंदे, मुकुंदराव पाटील, कृष्णराव भालेकर यांच्या लेखनातील विचारसूत्रे स्पष्ट करा.

**किंवा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्म व शिक्षणविषयक सुधारणावादी विचारांचा परामर्श घ्या.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) शि.म. परांजपे यांचे वक्रोक्तीपूर्ण विचार;

(ब) वि.दा. सावरकर यांच्या लेखनातील वैचारिकता.

(क) लालजी पेंडसे.

(*v*) **साहित्य : सर्जन व उपयोजन**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** साहित्यनिर्मिती प्रक्रिये संदर्भात भारतीय साहित्यशास्त्रकारांच्या विविध मतमतांतरांची चिकित्सा करा.

**किंवा**

साहित्यनिर्मिती प्रक्रियेतील कल्पनाशक्ती व चमत्कृती यांचे महत्व स्पष्ट करा.

**2.** चरित्र आणि आत्मचरित्र या साहित्य प्रकारातील लेखन वैशिष्ट्यांची ओळख करून द्या.

**किंवा**

'नाट्यनिर्मितीस दिग्दर्शकांची सर्जनशीलता परिणामकारक व प्रभावी ठरते' कसे ते सोदाहरण लिहा.

**3.** जुने साहित्यप्रकार नामशेष का होतात ? नवे साहित्यप्रकार निर्माण होण्याची कारणे स्पष्ट करा.

**किंवा**

लेखकाने स्वीकारलेल्या बांधिलकीच्या तत्वाची साधकबाधक चर्चा करा.

**4.** कथा आणि कविता या साहित्य प्रकारांची तुलना करा.

**किंवा**

विचार प्रधानता बोधपरता, भाषाशैलीतील प्रवाहीपणा यातून निबंधवाङ्मय आकारास येते. सोदाहरण चर्चा करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) ॲरिस्टॉटल कृत काव्यप्रकार;

(ब) 'कादंबरी' वाङ्मयप्रकाराची वैशिष्ट्ये;

(क) लेखकाच्या साहित्यनिर्मितीवर पडलेला कालप्रभाव;

(ड) भारतीय-'रीतीविचार'.

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| Seat No. | |
|---|---|

**[5202]-401**

**M.A. (Part II) (Sem. IV) EXAMINATION, 2017**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 5**

**(प्रसार माध्यमे आणि साहित्य व्यवहार)**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** वृत्त संकलन निर्मितीची संकल्पना स्पष्ट करून दूरचित्रवाणीवरील निर्माण होणाऱ्या मराठी मालिकेच्या शुभारंभाचे वृत्त संकलन करा.

**किंवा**

वृत्त संकलनाचे स्वरूप स्पष्ट करून महाविद्यालयातील सांस्कृतिक कार्यक्रम विषयक वृत्त संकलनाचा आराखडा तयार करा.

**2.** दृक्श्राव्य माध्यमासाठी नवीन गृह प्रकल्पाची जाहिरात तयार करा.

**किंवा**

दृक्श्राव्य माध्यमातील करावयाच्या जाहिरात लेखनाचे स्वरूप आणि विशेष उदाहरणासहित लिहा.

**3.** आकाशवाणीवरील विविध कार्यक्रमाचे लेखन कसे केले जाते ? साधार लिहा.

**किंवा**

दृक्श्राव्य माध्यमासाठी 'स्त्री भ्रूण हत्या' या विषयावर पटकथा लेखन करा.

**4.** पटकथा लेखनाची संकल्पना सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

प्रसार माध्यमांसाठी कोणती भाषिक कौशल्ये आवश्यक असतात सोदाहरण लिहा.

**5.** टीपा लिहा (फक्त **दोन**) :

(1) दूरदर्शनच्यासाठीची जाहिरात लेखनाची वैशिष्ट्ये

(2) रूपांतर कौशल्य

(3) आकाशवाणीसाठी स्वच्छता अभियान विषयक कार्यक्रमाचे निवेदन

(4) साहित्य संमेलनाचे वृत्त संकलन करा.

Total No. of Questions—**5**]

[Total No. of Printed Pages—**2**

| Seat No. | |
|---|---|

# [5202]-402

## M.A. (Part II) (Fourth Semester) EXAMINATION, 2017

## MARATHI (मराठी)

### अभ्यासपत्रिका क्र. 6

### (साहित्य-समीक्षा व संशोधन)

### (2008 PATTERN)

**वेळ : तीन तास**

**एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. संशोधनाची संकल्पना स्पष्ट करून, संशोधन प्रक्रियेतील विविध टप्प्यांचा परामर्श घ्या.

**किंवा**

संशोधकाच्या अंगी कोणते गुण आवश्यक असतात ते सोदाहरण विशद करा.

2. लोकसाहित्यविषयक संशोधनाचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

तौलनिक साहित्याभ्यासाचा परिचय करून द्या.

3. संशोधनात 'साहित्य आणि समाजशास्त्र' हे संयुक्त अभ्यासक्षेत्र कसे ठरते, ते साधार लिहा.

**किंवा**

साहित्य आणि संस्कृती यांचा परस्परसंबंधाचे स्वरूप विशद करा.

**4.** साहित्यसंशोधनाचा तत्त्वज्ञानाशी असलेला संबंध स्पष्ट करा.

**किंवा**

मराठीच्या पाश्चात्य संशोधकांचा परिचय करून द्या.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) हस्तलिखिते : एक संशोधन साधन

(2) लेखकाचा अभ्यास : संशोधनाचे एक अभ्यासक्षेत्र

(3) साहित्य आणि इतिहास

(4) महानुभाव वाङ्मयाचे संशोधन.

Total No. of Questions—**5+5**] [Total No. of Printed Pages—**4**

| Seat No. | |
|---|---|

# [5202]-403

**M.A. (Part II) (Sem. IV) EXAMINATION, 2017**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 7**

**(विशेष लेखकाचा अभ्यास)**

**(प्राचीन/अर्वाचीन)**

**(2008 PATTERN)**

**प्राचीन—संत तुकाराम**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** संत तुकारामांच्या अभंगाची छंदरचनेची वैशिष्ट्ये सांगा.

**किंवा**

संत तुकारामांच्या व्यक्तित्व व कवित्वाची सोदाहरण चर्चा करा.

**2.** 'संत तुकारामांचे अभंग लोकभाषेचा प्रत्यय देणारे आहेत' कसे ते साधार लिहा.

**किंवा**

'संत तुकारामांच्या कवितेचे मुख्य लक्षण म्हणजे ते प्रासादिक आहेत' साधार सांगा.

**3.** 'संत तुकाराम हे मराठी माणसाचे आणि मराठी सारस्वताचे संत आहेत' या विधानाचा परामर्श घ्या.

**किंवा**

संत तुकारामांच्या अभंगातील लोकरचनेची विविधता स्पष्ट करा.

**4.** संत तुकारामांच्या विद्रोही स्वरूपाच्या अभंगाचा परामर्श घ्या.

**किंवा**

'वेताळे फेताळे जळो त्यांचे तोंड काळे।' या अभंगाच्या आधारे तुकारामांच्या बंडखोरीचे वेगळेपण सांगा.

**5.** कोणत्याही **दोहा**वर टीपा लिहा :

(अ) 'आम्हा घरी धन शब्दाचीच रत्ने।' चे विचारसूत्र

(ब) तुकारामांच्या कवितेतील रूपके

(क) तुकारामांच्या कवितेतील स्त्रीपात्रे

(ड) तुकारामांच्या अभंगातील अलंकार

# [5202]-403

## अर्वाचीन—द. ता. भोसले

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** निसर्ग आणि ग्रामीण साहित्य यांच्या संबंधीचे द. ता. भोसले यांचे चिंतन सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

लोकजीवनाचे दर्शन 'लोक संस्कृती : स्वरूप आणि विशेष' या ग्रंथातून कसे घडते ते सविस्तर लिहा.

**2.** 'चावडीवरचा दिवा' या लेखसंग्रहाचे सोदाहरण विशेष सांगा.

**किंवा**

महान समाज सुधारक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याचावेध द. ता. भोसले यांनी कसा घेतला आहे, साधार लिहा.

**3.** 'ग्रामीण बोलीच्या शब्दकोशाचे महत्व ग्रामीण साहित्याच्या आकलनाच्या दृष्टीने मोलाचे आहे ते सोदाहरण लिहा.

**किंवा**

गाडगेबाबांच्या असामान्य अलौकीक व्यक्तिमत्वाचा वेध द. ता. भोसले यांनी 'लोकोत्तर गाडगेबाबा या ग्रंथात कसा घेतला आहे ? साधार लिहा.

**4.** 'संस्कृतीच्या पाऊल खुणा' या ग्रंथातील लोकजीवन विषयक विचारांचा परामर्श घ्या.

**किंवा**

द. ता. भोसले यांचे ग्रामीण साहित्याविषयीचे विचार स्पष्ट करा.

**5.** टीपा लिहा (फक्त **दोन**) :

(1) 'संस्कृतीच्या पाऊलखुणा' मधील पोतराज

(2) संत गाडगेबाबांचे कीर्तन

(3) लोक संस्कृतीतील भारूड

(4) 'चावडीवरचा दिवा' एक वेगळा अनुभव

Total No. of Questions—**5+5+5+5+5**] [Total No. of Printed Pages—**6**

| Seat No. | |
|---|---|

**[5202]-404**

**M.A. (Part II) (Sem. IV) EXAMINATION, 2017**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्रमांक 8 (ऐच्छिक)**

**(2008 PATTERN)**

**विशेष सूचना :—** खालील **पाच** प्रश्नपत्रिकांपैकी कोणतीही **एक** प्रश्नपत्रिका सोडवावी.

(1) लोकसाहित्याची मूलतत्त्वे आणि मराठी लोकसाहित्य

**किंवा**

(2) सौंदर्यशास्त्र

**किंवा**

(3) लेखनविधा व निबंधलेखन

**किंवा**

(4) साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास

**किंवा**

(5) साहित्य : सर्जन आणि उपयोजन

**(1) लोकसाहित्याची मूलतत्त्वे आणि मराठी लोकसाहित्य**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** मराठी लोकगीतांच्या विविध प्रकारांचा परामर्श घ्या.

**किंवा**

लोकसाहित्यातील श्रमगीते व भलरीगीते यांचा सोदाहरण आढावा घ्या.

P.T.O.

**2.** मराठी लोककथांच्या विविध प्रकारांचा परामर्श घ्या.

**किंवा**

लोककथांमागील प्रेरणा सांगून दैवतकथा, व्रतकथा यांचे स्वरूप स्पष्ट करा.

**3.** लोकरंजनाबरोबर लोकनाट्ये समाजप्रबोधनही कसे साधतात ते साधार लिहा.

**किंवा**

जागरण व गोंधळ यांची परंपरा व स्वरूप स्पष्ट करा.

**4.** लोकनाट्य व मराठी रंगभूमी यांची पूर्वपीठिका लिहा.

**किंवा**

महाराष्ट्र लोकसंस्कृती उपासकांच्या विविध कला-प्रकारांचा थोडक्यात आढावा घ्या.

**5.** खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) सरोजिनी बाबर यांचे लोकसाहित्यविषयक कार्य

(ब) भारूड

(क) लोकनाट्यातील विनोद

(ड) लोकसाहित्य संशोधन मंडळ, औरंगाबाद

# [5202]-404

## (2) सौंदर्यशास्त्र

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** सौंदर्यानुभवाचे स्वरूप सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

सौंदर्यभावनेचे कार्य आणि इतर भावनांचे कार्य यातील भेद लिहा.

**2.** कलाकृतीच्या सेंद्रिय एकतेविषयीच्या मतामतातरांचा परामर्श घ्या.

**किंवा**

ॲरिस्टॉटलची रूपविषयक संकल्पना विशद करा.

**3.** कलेच्या परिणामांचे स्पष्टीकरण करणाऱ्या सिद्धान्तांची ओळख करून द्या.

**किंवा**

भावनाविरेचन सिद्धान्ताच्या (catharsis) परिचय करून द्या.

**4.** सौंदर्यशास्त्र आणि साहित्यविचार यांतील परस्परसंबंध स्पष्ट करा.

**किंवा**

सौंदर्यशास्त्राच्या अभ्यासात समीक्षाक्षमता कशी विकसित होते, ते सोदाहरण लिहा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) कलाकृतीचे अर्थपूर्ण रूप

(ब) कांटची सौंदर्यमीमांसा

(क) परस्पर विरोधी प्रेरणांचा तोल–सौंदर्यभावना (रिचर्ड्स)

# [5202]-404

## (3) लेखनविधा व निबंधलेखन

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** मानवी जीवन व्यवहारातील भाषा वापराचे स्थान व महत्व स्पष्ट करा.

**किंवा**

भाषा आणि जीवनव्यवहार यातील परस्परसंबंध उलगडून दाखवा.

**2.** आधुनिक प्रसार माध्यमांतील भाषिक विविधतेची वैशिष्ट्ये लिहा.

**किंवा**

आधुनिक प्रसार माध्यमांसाठी करावयाच्या लेखनाचे स्वरूप विशद करा.

**3.** वृत्तपत्र ह्या प्रसारमाध्यमांतील जाहिरातीतील मराठी भाषेचे लेखन कसे करावे, ते लिहा.

**किंवा**

जनसंपर्कासाठी कोणकोणती भाषिक कौशल्ये असावी लागतात ते सोदाहरण स्पष्ट करा.

**4.** निबंधलेखनातील सुसूत्रता, तर्कशुद्धता व अर्थाभिव्यक्ती यांच्या वैशिष्ट्यांची चर्चा करा.

**किंवा**

संपादनासाठी आवश्यक असणारी विविध कौशल्ये लिहा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) आकाशवाणी या प्रसार माध्यमाचे गुणविशेष

(ब) साहित्याच्या भाषेचे वेगळेपण

(क) दुरदर्शनवरील संगीतविषयक कार्यक्रमाचे सादरीकरण

(ड) कार्यालयीन मराठी.

# [5202]-404

## (4) साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** साहित्याच्या सामाजिक दृष्टीने करण्यात येणाऱ्या अभ्यासाचे हेतू आणि महत्व विशद करा.

**किंवा**

साहित्याच्या सामाजिक अभ्यासाची प्रयोजने स्पष्ट करा.

**2.** लेखकाच्या व्यक्तिमत्व जडणघडणीत सामाजिक प्रभावांची व परिस्थितीची चर्चा करा.

**किंवा**

लेखक, समाज आणि साहित्य निर्मिती यांचा परस्परसंबंध उलगडून दाखवा.

**3.** विविध वाङ्मय प्रकारांची निर्मिती व त्यामागील प्रयोगशीलता कशी प्रत्ययाला येते, ते साधार लिहा.

**किंवा**

वाचक आणि साहित्य यांच्या परस्परसंबंधांची चर्चा करा.

**4.** तेन व कार्ल मार्क्स यांच्या परिस्थितीनिष्ठ दृष्टिकोनाचा परामर्श घ्या.

**किंवा**

आर्थिक, राजकीय, चळवळींचा साहित्यनिर्मितीवर पडणाऱ्या प्रभावांची चर्चा करा.

**5.** कोणत्याही **दोहोंवर** टीपा लिहा :

(अ) साहित्य—एक सामाजिक दस्तऐवज

(ब) साहित्य निर्मितीमागील ऐतिहासिक प्रभाव

(क) वाङ्मयीन अभिरुची

(ड) कलामूल्यांची जीवनसापेक्षता

# [5202]-404

## (5) साहित्य : सर्जन आणि उपयोजन

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** साहित्य निर्मिती प्रक्रियेतील भरतमुनींनी मांडलेल्या विचारांचा थोडक्यात परामर्श घ्या.

**किंवा**

साहित्य निर्मिती प्रक्रियेतील समस्यांचे विवेचन करा.

**2.** साहित्य-निर्मितीची प्रक्रिया आणि प्रसारमाध्यमे यांचा परस्परानुबंध विशद करा.

**किंवा**

समकालीन परिस्थितीचा साहित्य निर्मितीवर पडणाऱ्या प्रभावांची साधकबाधक चर्चा करा.

**3.** कोलरिजच्या साहित्य निर्मितीविषयक विचारांचा परामर्श घ्या.

**किंवा**

साहित्य निर्मिती प्रक्रियेतील भाषेचे स्थान व महत्व विशद करा.

**4.** 'साहित्य निर्मितील वाचकांचाही महत्वपूर्ण सहभाग राहतो'—साधार लिहा.

**किंवा**

साहित्य निर्मिती प्रक्रियेत लेखकाच्या सामाजिकतेची चर्चा करा.

**5.** कोणत्याही **दोहोंवर** टीपा लिहा :

(अ) साहित्य निर्मिती प्रक्रियेतील प्रतिभेचे स्थान

(ब) उत्प्रेक्षण शक्ती (Fancy)

(क) साहित्य निर्मिती आणि लेखकाचा दृष्टिकोन

(ड) इलेक्ट्रॉनिक्स मीडिया व साहित्य.